सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय**
**कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद**

फोन नं. ०२४०-२३३११३६ ई-मेल : didic.aurangabad@maharashtra.gov.in

## इतिवृत्त

मा. श्री. आस्तिक कुमार पाण्डेय, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या दि.२१/०६/२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्तः-

सर्वप्रथम सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.

सभेच्या सुरुवातीस मागील दि.३१.०८.२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त श्रीम. के.व्ही. खरात, महाव्यवस्थापक यांनी सादर केले. सर्वानुमते इतिवृत्त कायम करण्यात आले. सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. श्री.जी.बी. जोशी, सीएमआयए यांनी पुढीलप्रमाणे सुचना केल्या. औरंगाबाद येथून होणाऱ्या निर्यातीमध्ये अभियांत्रिकी क्षेत्रात उदा. Auto Component व इतर वाटा लक्षणीय असल्याने Engineering Export Promotion Council (EEPC), वरळी या कार्यालयाचे उपकेंद्र औरंगाबाद येथे व्हावे अशा आशयाचे अर्धशासकीय पत्र संबंधित अधिकाऱ्यांना द्यावे.

२. जोपर्यंत EEPC चे उपकेंद्र औरंगाबाद येथे कार्यान्वित होणार नाही तोपर्यंत संबंधित विभागाचा एक अधिकारी औरंगाबाद येथे आठवडयातून किमान २-३ दिवस मार्गदर्शनासाठी उपस्थित असावा. सदर अधिकाऱ्याची बसण्याची व्यवस्था CMIA कडून करण्यात येईल.
उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ बाबींचा समावेश असलेले अर्धशासकीय पत्र संबंधित अधिकाऱ्यांना देण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांना आदेशित केले.

३. निर्याती संदर्भात सर्व प्रमाणपत्रे, तपासणी प्रयोगशाळा, विपणन व इतर अनुषंगिक पायाभूत सुविधांची माहिती देणार सामूहिक सुविधा केंद्र (Cluster) औरंगाबाद येथे स्थापन व्हावे. जेणेकरुन लहान उद्योग घटकांना निर्याती संदर्भात अडचणी येणार नाहीत, अशी सुचना श्री. फुलारी, अध्यक्ष, उद्योग क्रांती संघटना यांनी केली.

४. यानंतर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) ला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडून घेतल्या जाणाऱ्या पुढाकाराबाबत माहिती दिली. एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत उत्पादनांचे Branding, विपणन इ.बाबत तांत्रिक सल्ला देण्यासाठी व एकत्रितपणे करावयाच्या इतर उपाययोजनांसाठी जिल्हयातील अग्रगण्य तांत्रिक संस्थासोबत Memorandum of Association करणार असल्याबाबत देखील माहिती दिली.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## उद्योग संचालनालय
## कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद

ई-मेल : didic.aurangabad@maharashtra.gov.in
फोन नं. ०२४०-२३३११३६

५. यावर मा. अध्यक्षांनी Maharashtra Institute of Technology, Aurangabad या संस्थेसोबत व जिल्हा नियोजन विभाग यांच्याशी समन्वय करुन जिल्हास्तरीय निर्यात विकास आराखडा बनवा जो जिल्हास्तरीय विकास आराखडयाचा (District Strategic Plan) भाग असेल, असे निर्देश दिले. तसेच, मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी मा. अध्यक्षांना दिलेल्या दि.०८/०५/२०२३ च्या अर्धशासकीय पत्रातील मुद्दा क्र. १ ते ७ वर कार्यवाही करण्यासाठी आराखडा बनविण्याबाबत देखील सूचना दिल्या.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी सर्वात शेवटी उपस्थितांचे आभार माणून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, औरंगाबाद.

मा. जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, औरंगाबाद.